# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संदर्भ - संलग्नता टी-२/२३३ दि.३०/०३/२०१७ रोजीचे परिपत्रक

**महोदय/महोदया,**

.दि. ०१ मार्च २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ लागू झाला असून सदर अधिनियमातील कलम ९७ नुसार प्रत्येक संलग्न स्वायत्त, अधिकारप्रद स्वायत्त महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी स्वतंत्र महाविद्यालय विकास समिती गठीत करण्याबाबत व सदरची समिती गठीत केल्यानंतर सदस्यांची नावे विद्यापीठ कार्यालयास कळविण्याबाबत तसेच ३० जून रोजी संपणाऱ्या प्रत्येक वर्षासाठी समितीने केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल तयार करून तो महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास तसेच विद्यापीठास सादर करण्याबाबत उपरोक्त संदर्भित परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. तथापि, अद्यापही बहुतांश महाविद्यालयांकडून सदरचा अहवाल प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

सबब, उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, । महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम कलम ९७ नुसार आपल्या महाविद्यालयात गठीत करण्यात आलेल्या महाविद्यालय विकास समितीची नावे व अहवाल affiliation.t२@unishivji.ac.in या ईमेल वर अहवाल तात्काळ सादर करावा.

आदेशान्वये

उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ १८८
दिनांक- 4 DEC 2018